# प्रेस नोट दिनांक ०८/०६/२०१९
# चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर
# विसरलेला मोबाईल हँडसेट परत मिळवुन दिले बाबत.

दिनांक ०५/०६/१९ रोजी १७.०० वा. चे सुमारास कु. दुलारी द्रुप पांडया, रा. उबाळेनगर, वाघोली, पुणे, यांचा मोबाईल हँडसेट कॅबमध्ये विसरुन त्या युवॉन आयटीमध्ये कामाचे ठिकाणी गेल्या होत्या. त्यांचा मोबाईल गहाळ झालेबाबत त्यांनी चंदननगर पोलीस ठाणेस प्रॉपर्टी मिसींग तक्रार दिलेली होती. त्यावरुन सदर मोबाईलचा शोध वपोनि.श्री.इंदलकर यांचे मार्गदर्शनाखाली पोउनि.किरण वराळ व पोशि.किरण पालांडे हे घेत असतांना त्यांचा कॅब चालक श्री.राजेंद्र नामदेव कदम, रा. टीसी कॉलनी, स.नं. ४०, किवळे, विकासनगर, पुणे यांचेशी संपर्क झाला. कॅबचालक यांनी सदरचा मोबाईल हँडसेट त्यांचेकडे असलेची दि. ०६/०६/२०१९ रोजी माहिती देवुन ते मुंबई येथे असल्याने दिनांक ०७/०६/१९ रोजी मोबाईल हँडसेट घेवुन चंदननगर पोलीस स्टेशन येथे येतो असे त्यांनी कळविले. दिनांक ०७/०६/१९ रोजी कॅब चालक नामे श्री. राजेंद्र नामदेव कदम हे मोबाईल हँडसेट घेवुन चंदननगर पोलीस ठाणे येथे सायंकाळी १७.०० वा. चे सुमारास हजर झाले. त्यानंतर कु. दुलारी द्रुप पांडया यांना त्यांचा मोबाईल घेवुन जाणेसाठी पोलीस ठाणेस बोलाविले असता त्या पोलीस ठाणेमध्ये हजर झाल्या. कॅबचालक श्री. राजेंद्र नामदेव कदम, वपोनि. कृष्णा इंदलकर, पोउनि. किरण वराळ यांनी सदरचा मोबाईल हँडसेट कु. दुलारी द्रुप पांडया यांचे ताब्यात दिला. सदरवेळी कु. दुलारी द्रुप पांडया यांना त्यांचा मोबाईल हँडसेट अल्पावधीत पोलीसांनी शोधुन दिल्याने खुप आनंद होवुन, पोलीस व कॅबचालकाचे कौतुक करुन, सर्वांचे आभार मानले आहेत. मोबाईल हँडसेट देतांना घेतलेला फोटो खालीलप्रमाणेः-

